# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### मुंबईच्या अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१) १३ (१७-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २३५८६ ला दिनांक ५ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याची घोषणा होऊन आठ ते दहा वर्षे इतका कालावधी होऊनही अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.पंतप्रधानांच्या हस्ते जलपुजन झालेले अरबी समुद्रातील शिवस्मारक गेल्या आठ वर्षापासून प्रलंबित असून दिनांक २४ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास शिवस्मारकाच्या जल पुजनाचा कार्यक्रम होऊन काम प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शिवप्रेमींमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्मारकाचे काम सुरु करुन तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (३०-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मुंबई अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक उभारण्याबाबत बाब ही न्याय प्रविष्ट असून प्रकरणी मा.न्यायालयाच्या अंतिम आदेशास अनुसरून सदर प्रकल्पाबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

### मुंबईतील संक्रमण शिबिरात राहणाऱ्यां कुटुंबियांना हक्काची घरे मिळण्याबाबत

**(२) ७६ (१७-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धोकादायक इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी म्हाडाकडून तेथील रहिवाशांचे संक्रमण शिबिरात स्थलांतरण करण्यात येत असून अशा वर्षानुवर्षे संक्रमण शिबिरात राहणाऱ्यांना कुटुंबियांना त्यांची हक्काची घरे मिळावीत याकरीता म्हाडाने बृहतसूची (मास्टरलिस्ट) सुरु करुन सोडतीव्दारे घरे देण्याची कार्यपध्दती सुरु केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संक्रमण शिबीरात राहणाऱ्या कुटुंबांना किती वर्षात हक्काची घरे देण्यात येतील तसेच पुनर्वसनाचे धोरण काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ज्या विकासकांनी इमारतीचा पुनर्विकास करण्यास घेतला आहे त्या विकासकांवर महारेरा कायद्याच्या अनुषंगाने दंडात्मक कारवाई करुन संक्रमण शिबिरातील कुटुंबियांना त्यांची हक्काची घरे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-१०-२०२५) :** (१) व (२) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील उपकर प्राप्त इमारतीमधील ज्या भाडेकरु/रहिवाशांना निष्कासन सूचना (व्हेकेशन नोटीस) देऊन इमारत खाली करण्यात आलेली होती. परंतु, अरुंद भूखंड, आरक्षण, रस्ता रुंदीकरण इत्यादी कारणामुळे त्यांच्या मूळ इमारतींचा पुनर्विकास शक्य झाला नाही. तसेच, ज्या उपकरप्राप्त इमारती पुनर्रचित झालेल्या आहेत, परंतु, कमी गाळे बांधले गेले, यामुळे त्या मूळ भाडेकरु / रहिवाशी यांना मंडळाव्दारे पुनर्रचित/पुनर्विकसित इमारतींमध्ये कायमस्वरुपी गाळा देता आलेला नाही व ते किंवा त्यांचे वारसदार संक्रमण शिबिरात स्वत: अधिवास धारण करीत आहेत, अशा मूळ भाडेकरु/रहिवाशी अथवा त्यांचे वारसदार यांच्याकडून जाहिरातीव्दारे अर्ज मागविण्यात येतात. बृहतसूची समितीसमोर सुनावणी घेऊन पात्र ठरलेल्या मूळ भाडेकरु/रहिवाशी यांना गाळे वितरण करण्यात येते. याबाबतची कार्यप्रणाली उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे दिनांक २२/१२/२०२३ च्या परिपत्रकाव्दारे निश्चित करण्यात आली आहे.
(३) महारेरा कायदा हा भाडेकरु/रहिवाश्यांच्या पुनर्वसन घटकांसाठी लागू नसून फक्त विक्रीयुक्त बांधकामाधील सदनिकेसाठी लागू आहे.

ज्या मालक/विकासकांनी उपकरप्राप्त इमारतींचे पुनर्विकास प्रकल्प अर्धवट अवस्थेत सोडले आहे किंवा वेळेत पूर्ण केले नाही किंवा भाडेकरु रहिवाश्यांचे भाडे थकविले आहे, अशा मालक/ विकासकाचे प्रकल्प भूसंपादित करुन म्हाडाने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनाने म्हाडा अधिनियमात कलम ७७,७९ व ९१ मध्ये सुधारणा करुन सुधारित कलम ९१ (अ) अंतर्भुत केले आहे.

गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दिनांक २२/०८/२०२३ अन्वये कलम ९१ (अ) अंतर्गत करावयाचे कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई पोलीस भरती २०२१ मधील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती देणेबाबत

**(३) १९८ (२३-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस भरती २०२१ मधील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची कागदपत्रे व पोलीस अहवाल तपासणी पूर्ण झालेली असून त्यांची वैद्यकीय तपासणी करून नियुक्ती देणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ रोजी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री (गृह विभाग) यांना निवेदन सादर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे तसेच प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना तात्काळ नियुक्ती देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०२५) :** (१) होय.
(२) अंतिम प्रतिक्षा यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून १ वर्षासाठी अथवा पुढील भरती प्रक्रिया सुरु होईपर्यंत विधीग्राह्य असते. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती सन २०२२-२३ ची कार्यवाही सुरु झाल्याने, पोलीस शिपाई भरती सन २०२१ ची प्रतिक्षा यादी व्यपगत झाली आहे. तथापि, सदरच्या भरती प्रक्रियेमधील प्रतिक्षा यादीतील जे उमेदवार निवड यादीत समाविष्ट झाले आहेत आणि ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे पडताळणी व चारित्र्य पडताळणीचे अहवाल प्रलंबित आहेत अशा उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्यास्तरावरुन सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यामध्ये औषधी दुकानांचे (फार्मसी) परवाने निलंबित व रद्द करण्यात आल्याबाबत

**(४) २२७ (२४-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यामध्ये अन्न व औषध प्रशासनामार्फत माहे एप्रिल, २०२३ ते ऑक्टोबर, २०२४ दरम्यान अनेक औषधी दुकानांची तपासणी करुन ६८ औषधी दुकानांचे (फार्मसी) परवाने निलंबित करण्यात आले तसेच ३ दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे. चौकशीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनामार्फत ६८ परवाने निलंबित व ३ दुकानांचे परवाने रद्द करण्याची कारणे काय आहेत तसेच केलेल्या कारवाईची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.नरहरी झिरवाळ (०२-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून एकूण ७१ औषध विक्रेते यांच्या तपासण्या करण्यात आल्यानंतर परवाना अटींचे अनुपालन न करणाऱ्या ६८ परवाने धारकांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत. ज्याप्रकरणी गंभीर त्रुटी आढळून आल्या अशा ०३ प्रकरणी परवाने, रद्द करण्यात आले आहे.
परवाना प्राधिकारी यांनी घेतलेल्या निलंबन अथवा रद्दच्या कारवाईबाबत शासनाकडे अपील करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत ६८ निलंबित परवान्यांपैकी १४ पेढयांनी अपील अर्ज शासनास सादर केला आहे. तसेच ०३ रद्द परवान्यांपैकी ०१ पेढीने शासनाकडे अपील दाखल केले

आहे. उर्वरित पेढयांनी निलंबन व रद्द आदेशांचे अनुपालन केले आहे.

---

## राज्यातील आदिवासी समाजासाठीच्या रिक्त् पदांची विशेष पद भरती करण्याबाबत

**(५) २४३ (२२-०४-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २१ डिसेंबर, २०१९ व दिनांक १४ डिसेंबर, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमीत करुन ३१ जुलै, २०२३ पर्यंत आदिवासी समाजाची विशेष पदभरती करण्याचे निर्देश दिल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी समाजासाठी राखीव असलेली १२५०० पदे रिक्त असून सदर पदाची विशेष भरती मोहीम अद्याप राबविली नसल्याने आदिवासी समाजातील उमेदवारांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णयानुसार आदिवासी समाजासाठीची रिक्त असलेली १२५०० पदे तात्काळ भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०२५) :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३१४०/२०१८ करीता दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये प्रशासकीय विभागांनी सादर केलेल्या माहितीनुसार शासन सेवेत दिनांक १५/०६/१९९५ ते ३१/०८/२०१५ या कालावधीमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्त झालेले तथापि, जातवैधता प्रमाणपत्र सादर न केलेले १२५२० कर्मचारी असल्याचे नमूद केले आहे. यापैकी अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे विशेष मागास प्रवर्गाचे/ अन्य राखीव प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर करून सेवेत राहिलेले कर्मचारी ३१७२ आहेत. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव प्रलंबित असलेल्या, अर्ज सादर न केलेल्या व सेवेतून काढून टाकलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची एकूण संख्या ७४४९ आहे.

शासन निर्णय दिनांक २१/१२/२०१९ अन्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने / जातवैधता सादर न केल्याने अधिसंख्य पदांवर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या प्रत्यक्षात ६८६० इतकी असल्याचे सर्व प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार दिसून आले आहे. अशा प्रकारे कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे रिक्त झालेली १३४३ पदे अनुसूचित जमाती प्रवर्गातून भरण्यात आल्याची माहिती विभागांकडून प्राप्त झाली आहे. सरळ सेवेने विहित प्रक्रीयेद्वारे पदभरती करताना इतर राखीव प्रवर्गाप्रमाणेच अनुसूचित जमाती प्रवर्गाची रिक्त पदे भरण्याची प्रक्रीया संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत निरंतर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाबळेश्वर तालुक्यातील किल्ले प्रतापगडाच्या संवर्धनासाठी कृती आराखडा करण्याबाबत

**(६) ७३३ (२२-०४-२०२५) श्री.अमित गोरखे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाबळेश्वर (जि.सातारा) तालुक्यातील प्रतापगड किल्ल्याच्या संवर्धनाची कामे, गुणवत्ता व दर्जेदार करा, असे निर्देश मा.पर्यटन मंत्री यांनी दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किल्ले प्रतापगडाच्या संवर्धनाबाबत शासनाने कृती आराखडा तयार करून निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई (१७-०७-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

नियोजन विभागाने दिनांक ०५/०३/२०२४ च्या शासन निर्णयानुसार सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटन स्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा अंतर्गत रुपये ३८१.५६ कोटी रक्कमेच्या आराखड्यास मंजुरी दिलेली आहे. यामध्ये प्रतापगड किल्ला जतन व संवर्धनासाठी रुपये १२७.१५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या, दिनांक १९/०७/२०२४ च्या शासन निर्णयान्वये प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. तसेच, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ०६/०२/२०२३ अन्वये प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी छत्रपती शिवाजी महाराज सृष्टी निर्माण करणे ही कामे २ टप्प्यात करण्याकरीता एकूण १०.०० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जेएनपीटी बंदरासाठी १२ हजार शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनींबाबत

**(७) ११०३ (१७-०४-२०२५) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतातील प्रमुख कंटेनर पोर्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) बंदरासाठी सन १९८६ मध्ये वा त्यादरम्यान म्हणजेच ४१ वर्षांपूर्वी शहर व औद्योगिक विकास महामंडळाने (सिडको) सुमारे १२ हजार शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबदल्यात नवी मुंबईप्रमाणे साडेबारा टक्के विकसित भूखंड देण्यास केंद्र शासनाने दर्शविलेल्या विरोधास ३२ वर्षे लढा दिल्यानंतर सिडकोने विकसित भूखंड देण्याचे मान्य केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या (सिडको) प्रशासनासोबत याबाबत दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे तसेच अन्य नस्तींबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या १९६ नस्ती तसेच २७ भूखंड एकत्रित करुन ते वितरीत करावे अशा

करण्यात आलेल्या मागणीच्या अनुषंगाने केवळ २० नस्तींचे एकत्रिकरण केले असून उर्वरित नस्ती जाणीवपूर्वक सादर न करण्यात आल्याबाबत साशंकता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१०-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

नवी मुंबई प्रकल्पाकरीता राज्य शासनाने ठाणे व रायगड जिल्ह्यातील ९५ गावातील जमिनी संपादित करुन नवी मुंबई या नवनगराच्या निर्मितीसाठी "नवनगरविकास प्राधिकरण" म्हणून सिडकोच्या ताब्यात दिल्या. सन १९८४ मध्ये १२ गावातील खाजगी (११६९.५७ हे.आर) शासकीय व खारजमीन मिळून जवळपास २५७९ हे.जमीन सिडकोमार्फत न्हावा शेवा येथील बंदर प्रकल्पास (जे.एन.पी.ए.) हस्तांतरीत करण्यात आली आहे.
(२) जेएनपीए प्रकल्पासाठी सिडकोने हस्तांतरित केलेल्या जमिनीच्या भूधारकांना १२.५% जमीन वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन निर्णय दिनांक १४/०८/२०१४ अन्वये घेण्यात आला आहे.
(३), (४) व (५) दिनांक ९/०१/२०२५ व दिनांक २१/०१/२०२५ रोजीच्या बैठकींमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार विविध गावांतील भूधारकांची २७०० चौ.मी. पात्रतेचे एकत्रिकरण करुन २००० चौ.मी. इतका भूखंड मिळतो. त्यामुळे सर्व भूधारकांच्या कागदपत्रांची पुर्तता करुन वाटप शक्य होत नाही. वैयक्तिक निवाडानिहाय पात्रतेनुसार भूखंड देणे शक्य असल्यास पात्रतानिहाय नियोजन व आराखडा तयार करणेबाबत जेएनपीए प्राधिकरणास सिडकोमार्फत कळविण्यात आले आहे.

सन २०१६ ते २०१९ या कालावधीत जेएनपीएकडून प्रकल्पग्रस्तांच्या सिडकोस आजतागायत प्राप्त २१२ संचिकापैकी १९० संचिकामध्ये ५ संगणकीय सोडतीद्वारे एकूण १९३ भूखंड इरादीत करण्यात आले आहेत. उर्वरित २२ संचिकांच्या अनुषंगाने संगणकीय सोडतीद्वारे भूखंड इरादित करण्याचे सिडकोमार्फत प्रस्तावित आहे. सदर इरादित केलेल्या भूखंडांबाबत कागदपत्रांची पुर्तता करणेसाठी ग्रामपंचायतींमध्ये जाहीर प्रसिध्दी करुन दिनांक ३/१०/२०२३ ते दिनांक ५/१२/२०२३ या कालावधीत प्रकल्पग्रस्तांसाठी शिबीरे करण्यात आली आहे. १२.५% योजनेंतर्गत जेएनपीए प्रकल्पग्रस्तांस २००० चौ.मी. पात्रतेकरीता (२.० चटई क्षेत्र निर्देशांक) इतक्या क्षेत्राच्या भूखंडाचे वाटप करण्याच्या वेगवेगळया कुटुंबातील निवाडाधारक सामंजस्याने एकत्रित येत नसल्याने तसेच कागदपत्रांची पुर्तता जसे न्यायालयीन वारस दाखले, प्रतिज्ञापत्रे, रहिवाशी दाखले, जाबजबाब इत्यादी पुर्तता होत नसल्याने विलंब होत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ममदापूर पाटोदा (ता.अंबाजोगाई) येथील ग्रामपंचायतीतील महिला सरपंचाकडून खंडणी मागितल्याबाबत

**(८) १११८ (२३-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ममदापूर पाटोदा (ता.अंबाजोगाई) येथील ग्रामपंचायतीतील महिला सरपंचाकडून एक लाख रुपयांची खंडणी मागितल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले आहे व चौकशीच्या अनुषंगाने खंडणी मागणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) पो. स्टे. अंबाजोगाई ग्रामीण येथे गु.र.नं. १९/२०२५ कलम ३०८(३), ३५१(२)(३), ३(५) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यातील आरोपींना कलम ३५ (३) बी.एन.एस.एस. प्रमाणे नोटीस देण्यात आलेली असून गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

---

## भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र दिपनगर येथील प्रकल्पग्रस्त यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत

**(९) १५५५ (२३-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगाव) विद्युत केंद्र दिपनगर येथील प्रकल्पग्रस्त तुटपुंज्या मानधनावर काम करीत असून वाढत्या महागाईमूळे कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नसल्याने प्रकल्पग्रस्तांची मागणी व समस्या सोडविणेसंदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक ३०/०१/२०२४ रोजी वा त्यासुमारास मा.ऊर्जा मंत्री, प्रधान सचिव ऊर्जा विभाग, व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पग्रस्ताच्या मागण्या व समस्या सोडविणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०२५) : (**१) होय, हे खरे आहे. महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्तांना विविध आस्थापनात नियमित रोजगार / नोकरी मिळविता यावी, यास्तव प्रगत कुशल प्रशिक्षण देण्याची योजना राबविण्यात येत. त्यानुसार महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्तांना प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी म्हणून घेण्यात येते. प्रशिक्षणावर रुजू झाल्यानंतर त्यांना प्रशिक्षणाच्या कालावधीत प्रतिमाह विद्यावेतन अदा करण्यात येते. महानिर्मिती कंपनीचे प्रशासकीय परिपत्रक क्र.४३०, दिनांक ३०/०१/२०१९ अन्वये प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षणाच्या अनुभव/ शिक्षणावरुन रुपये १४०००/-ते १६०००/- इतके विद्यावेतन अदा करण्यात येते.

तसेच महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.५५९, दिनांक ०८/१०/२०२४ नुसार प्रकल्पग्रस्त प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी उमेदवारांच्या प्रतिमाह विद्यावेतनात रुपये २०००/-ते ५०००/- इतकी वाढ करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेल्या प्रकल्पग्रस्त प्रशिक्षणार्थींना देखील विद्यावेतनात

महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.५६४, दिनांक १३/१२/२०२४ नुसार एक वेळ (One Time) रुपये २०००/- ते रुपये ५०००/- इतकी वाढ करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जायदरे व राजापूर (ता.येवला जि.नाशिक) येथील साठवण तलावांच्या पाणी उपलब्धता प्रमाणप्रत्र प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**(१०) १७१५ (२४-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायदरे व राजापूर (ता.येवला जि.नाशिक) येथील साठवण तलाव योजनांसाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळण्याकरीता जलविज्ञान व धरण सुरक्षितता विभाग नाशिक यांनी दिनांक ४ एप्रिल २०२४ रोजी वा त्यादरम्यानच्या पत्रान्वये सुधारित प्रस्तावाची मागणी करूनही मृद व जलसंधारण प्रादेशिक विभाग, पुणे यांनी माहे जानेवारी २०२५ पर्यंत प्रस्ताव दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव मृद व जलसंधारण विभागाने तातडीने पाठविण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास अप्पर आयुक्त मृद व जलसंधारण प्रादेशिक विभाग पुणे यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साठवण तलाव या योजनांसाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळण्याकरीताचा प्रस्तावाच्या अनुषंगाने मृद व जलसंधारण विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१७-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर दोन्ही योजनांचा समावेश राज्य एकात्मिक जल आराखड्यात नावानिशी समावेश करण्यासाठी मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचेकडे अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता यांच्या दिनांक २९/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे. सादर केलेल्या प्रस्तावानुसार मान्यता प्राप्त झाल्यानंतर दोन्ही योजनांचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रस्ताव मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता विभाग, नाशिक यांना फेर सादर करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोंदिया जिल्ह्यातील पोलीस पाटलांचे नियमित मानधन देण्याबाबत

**(११) १७६७ (२४-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील पोलीस पाटलांचे नियमित मानधन देण्याबाबत संबंधित पोलीस पाटील यांनी पोलीस अधिक्षकांना निवेदन दिले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस पाटलांना दर महिन्याला नियमित मानधन देतेवेळी नुतनीकरणाची प्रत व मूळ आदेशाची प्रत देण्याबाबतची मागणी बंद करावी तसेच त्यांच्या इतर मागणीसंदर्भात निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोंदिया जिल्ह्यातील पोलीस पाटलांचे नियमित मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने गोंदिया जिल्हा कोषागार कार्यालयाने पोलीस पाटील यांचे दरमहा मानधन अदा करण्यासाठी पोलीस पाटील यांचे नुतनीकरणाची प्रत व मूळ आदेशाची प्रत मागविण्यात येऊ नये, याबाबत विनंती केली असून सदर पोलीस पाटील यांचे नियमित मानधन अदा करताना नुतनीकरणाची प्रत व मूळ आदेशाची प्रत माहे फेब्रुवारी, २०२५ च्या मानधनापासून बंद करण्यात आली असल्याचे गोंदिया, जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले आहे.
(३) गोंदिया जिल्ह्यातील पोलीस पाटील यांचे मानधन नियमित वेळेवर अदा करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आरे स्टॉल वारसांच्या नावे हस्तांतरित करण्याबाबत

**(१२) १८२० (२३-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरे स्टॉलधारकांच्या मृत्यूनंतर अथवा केंद्रधारक वयोमानानुसार ६० वर्षे वयाचा झाल्यास किंवा जर्जर आजाराने त्रस्त असल्यास त्याच्या वारसाच्या नावावर केंद्र हस्तांतरण करावे आणि या प्रक्रियेसाठी वारसाला कमीत कमी सहा महिन्यांचा कालावधी देण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र दूध वितरण सेनेने मा.दुग्धविकास मंत्री महोदयांकडे दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने आरे स्टॉल वारसांच्या नावे हस्तांतरित करण्याबाबत शासनाने कोणता सकारात्मक निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१७-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुळ परवाना धारकाचा मृत्यू झाल्यास एक महिन्याच्या आत प्राप्त अर्जदारास त्याच्या रक्तांच्या कायदेशीर वारसांपैकी कोणत्याही एका पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या वारसदारास केंद्र नावे / हस्तांतरण करण्यास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही केली जाते. तसेच प्रकृती अस्वास्थ्यामुळे परवानाधारक केंद्र चालविण्यास असमर्थ असल्यास परवानाधारकांच्या रक्त संबंधातील नातेवाईक यांना केंद्र हस्तांतरण करण्यास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील जेष्ठांची सुरक्षा धोक्यात आल्याबाबत

**(१३) २१३१ (२३-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामध्ये मागील तीन महिन्यांपासून ज्येष्ठ नागरिकांच्या घरात घुसून लूटमार घरफोड्या व चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाढत्या घटनांमुळे तेथे राहणाऱ्या तब्बल दीड हजार ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा धोक्यात आली असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर शहरात वाढत असलेल्या चोरीच्या वाढत्या घटनांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले चोरीच्या वाढत्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी व ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षा देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही,

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत मागील तीन महिन्यात (माहे नोव्हेंबर, डिसेंबर २०२४ व जानेवारी २०२५) ज्येष्ठ नागरिकांच्या घरात घुसून लूटमार, घरफोड्या व चोरीच्या घटना खालीलप्रमाणे असून नोव्हेंबर, डिसेंबर-२०२३ व जानेवारी-२०२४ या कालावधीशी तुलना करता गुन्ह्यात वाढ झालेली नाही.

| | दाखल | उघड | दाखल | उघड |
|---|---|---|---|---|
| लुटमार | ६ | ४ | ७ | ३ |
| घरफोडी | १४ | १ | ३४ | ६ |
| चोरी | २४ | ४ | २९ | ३ |

(२) हे खरे नाही.

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत दिनांक ३०/०५/२०१० व दिनांक ३०/११/२०२२ अन्वये भरोसा सेल (डिटेक्शन), गुन्हे शाखा येथे ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापित करण्यात आले आहेत. नागपूर शहरातील एकूण ३३ पोलीस ठाण्यामध्ये स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन आहेत.

भरोसा सेल येथे एकूण-३ दामिणी पथक कार्यान्वित असून भरोसा सेल येथील दामिणी पथक व ज्येष्ठ नागरिक कक्षातील अधिकारी व अंमलदार हे ज्येष्ठ नागरिकांना प्रत्यक्षात भेटी देतात व त्याच्या अडीअडचणी बाबत विचारपूस करून निराकरण करतात. महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्था यांचेशी समन्वय साधून ज्येष्ठ नागरिकांच्या वेळोवेळी प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधी कार्यवाही करण्यात येते.

(३) नागपूर शहरात ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षा देणे व ज्येष्ठ नागरिकांविरुध्द गुन्हे घडू नये याकरीता त्यांच्या राहत्या घराजवळील परिसरात दामिनी पथकाकडून तसेच पोलीस स्टेशन कडील बिट मार्शल यांच्यामार्फत गस्त घातली जाते. ज्येष्ठ नागरिकांच्या नियमित बैठका घेण्यात येत असून, पोलीस व ज्येष्ठ नागरिकांमध्ये मैत्रिपूर्ण संबंध प्रस्थापित आहेत. पोलीस त्यांचे निवासस्थानी सदीच्छा भेट देतात तसेच डॉक्टर, वकील, सेवानिवृत्त, ज्येष्ठ नागरिक, एकटे राहणारे सामाजिक कार्यकर्ते यांची हितगुज या योजनेच्या माध्यमातून नियमित बैठकी घेऊन त्यांच्यात सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यात येते.

१) ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याकरीता पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर शहर येथे ज्येष्ठ नागरिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.
२) दिनांक ०५/१०/२०२४ रोजी संताजी सभागृह, बुधवारी बाजार, सोमवारी क्वॉर्टर येथे ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठाण तर्फे ज्येष्ठ नागरिक वार्षिक अधिवेशन उद्धाटन सोहळा आयोजित करण्यात आलेला होता.सदर सोहळ्यामध्ये ज्येष्ठ नागरिक कक्षातर्फे करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबत आणि ज्येष्ठ नागरिकाच्या ऑनलाईन नोंदणी करीता निर्मित क्यु आर कोड बाबत माहिती देण्यात आली. क्यू आर कोड बाबत जाहीरात प्रसारीत करण्यात आलेली आहे.
३) नागपूर शहरात अस्तित्वात असलेल्या १७८ ज्येष्ठ नागरिकांच्या संस्थांना क्यु आर कोड आणि भरोसा सेल, ज्येष्ठ नागरिक कक्षाबाबत माहिती देण्यात आली. तसेच व्हॉटसअॅप गृप तयार करण्यात आला असून त्यावर प्राप्त तकारींचे निराकरण करण्यात येते.
४) भरोसा सेल येथे ज्येष्ठ नागरिकांकरीता असलेल्या हेल्पलाईन क्रमांक ०७१२-२२२६५३३ बाबत नागरिकांना वेळोवेळी जाहिरातीव्दारे तसेच जनजागृतीव्दारे माहिती देण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पशुवैद्यकीय रुग्णालयांना औषध खरेदीसाठी निधी वाढवून मिळण्याबाबत

**(१४) २६७७ (१७-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पशुवैद्यकीय रूग्णालयात श्रेणी-१ साठी रूपये २ लाख, श्रेणी-२ च्या रूग्णालयासाठी रुपये १ लाख, औषधी खरेदीसाठी अनुदान देण्यात येत असून, साडेचार हजार पशुवैद्यकीय रुग्णालयांना मिळत असलेला अत्यल्प निधीतून औषधी खरेदी करण्यात अडचणी येत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर औषध खरेदीच्या निधीमध्ये वाढ करुन देण्याचा प्रस्ताव गत कित्येक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल-२०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सन २०१९ च्या पशुगणनेनुसार एकूण पशुची संख्या १९.५० लाख असून श्रेणी-१ चे १७४१ पशु वैद्यकीय दवाखाने असून २८४१ श्रेणी-२ चे दवाखाने आहेत. परंतु निधीच्या अभावी औषधांच्या तुटवड्यामुळे शेतकऱ्यांना पशुंच्या औषधोपचारासाठी स्वतः पैसे खर्च करावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदर निधी वाढविण्याच्या प्रस्तावासंदर्भात कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०९-२०२५) :** (१) खरे आहे.
(२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक २८/०२/२०२२ अन्वये पशुवैद्यकीय संस्थानिहाय औषध खरेदीसाठी

निधी उपलब्धतेची मर्यादा विहित करण्यात आली होती. त्यानुसार पशुवैद्यकीय संस्थाच्या अधिपत्याखालील कार्यक्षेत्र, सदर कार्यक्षेत्र उद्भवणारे आजार, पशुधन संख्या, पशुउपचार संख्या यात विविधता असल्याने संस्था निहाय एकसारखा निधी मंजूर करण्यात येत होता त्यामुळे जास्त कार्यक्षेत्र असलेल्या पशुवैद्यकीय संस्थेच्या क्षेत्रात निधीची कमतरता भासत होती. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक २३/०५/२०२५ अन्वये जिल्ह्यातील पशुधन संख्या, गेल्या तीन वर्षातील दैनंदिन रुग्ण सरासरी, उद्भवलेला साथरोग, उपलब्ध औषधसाठा याबाबींचा विचार करुन जिल्हा उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना आवश्यकतेनुसार औषधी खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल महानगरपालिका हद्दीतील गृहनिर्माण सोसायट्यांचा पुनर्विकास हा "स्वयंपुनर्विकास" धोरणानुसार करण्याबाबत

**(१५) ४५०७ (१८-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल येथील सेक्टर १ ते ११ मधील असलेल्या १५०० पेक्षा अधिक गृहनिर्माण सोसायट्यांचा पुनर्विकास हा "स्वयंपुनर्विकास" धोरणानुसार करण्यास शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांचे ना- हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक असलेला भाडेपट्टा करार करण्यास सिडकोकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एक लाखांहून अधिक नागरिकांच्या मनात "स्वयंपुनर्विकास" कसा करायचा असा प्रश्न निर्माण झाल्याची बाब माहे मे, २०२५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली असून या १५०० सोसायट्यांच्या इमारतीपैकी अनेक इमारती या धोकादायक असल्याने त्या रिक्त करण्याच्या नोटीशी महानगरपालिका पनवेल यांच्याकडून देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू १५०० हुन अधिक सोसायट्यांच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागावा म्हणून सिडकोकडून भाडेपट्टा करार करण्यास व ना- हरकत प्रमाणपत्र मिळावी म्हणून शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१०-२०२५) :** (१) व (२) शासन अधिसूचना, दिनांक २०/०३/१९७१ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३(१) नुसार नवी मुंबई प्रकल्पाकरीता ठाणे, पनवेल व उरण तालुक्यातील एकूण ९५ गावांतील क्षेत्रासाठी सिडको महामंडळाची "नवनगरविकास प्राधिकरण (NTDA)" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सिडको महामंडळाकडून नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारित), नियमावली, २००८ अंतर्गत विविध प्रयोजनासाठी विहित पध्दतीने भुखंडांचे वाटप करण्यात येते. सदरचे भूखंड हे ६० वर्षाच्या भाडेपट्ट्याने विहित अटी व शर्ती नुसार वाटप करण्यात येतात. भूखंडाची भाडेपट्टा रक्कम जमा केल्यानंतर भाडेपट्टा करारनामा करून भूखंडाचा ताबा देण्यात येतो व बांधकाम परवानगी देण्यात येते. सिडको महामंडळाने विकासाचे वैवध्य साधण्यासाठी बंगलो / रो हाऊस यासाठी भूखंडांचे नियोजन केले आहे.

त्याप्रमाणे कुटुंबांच्या वैयक्तिक वापरासाठी अटी व शर्तीच्या अधीन भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. परंतु बहुतांश भूखंडधारकांनी / भाडेपट्टाधारकांनी बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर बहुसदनिका इमारती बांधून अन्य व्यक्तींना विक्री करून त्रयस्थ हितसंबंध निर्माण केले आहेत व सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या आहेत.

परंतु, गृहनिर्माण संस्थांची बहुसदनिकांचे बांधकाम नियमित करण्याची मागणी विचारात घेवून सिडको महामंडळाने संचालक मंडळाचा ठराव क्र. ११४९६, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार १०० चौ. मी. क्षेत्रफळापर्यंतच्या सदनिकांचे बांधकाम असलेल्या इमारती नियमित करण्याचे धोरण निश्चित केले होते. परंतु १०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्रफळाच्या सदनिका असलेल्या मालमत्ता विकसित करणे अशक्य असल्याने अनधिकृत बांधकामास चालना मिळत होती. सबब, परवडणाऱ्या घरांबाबतचे धोरण, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० (UDCPR) अंतर्गत चटई क्षेत्र निर्देशांक बाबतचे (FSI) नियम व सदनिका नियमित करण्याबाबतची सदनिकाधारकांची / सोसायटीधारकांची वाढती मागणी विचारात घेवून, बंगलो प्लॉटवरील बहुसदनिकांचे बांधकाम नियमित करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळाचा ठराव क्र. १२७७०, दिनांक १४/०९/२०२३ नुसार मंजूर केला आहे. त्यानुषंगाने बंगलो, रो हाउस तसेच १२.५% पुनर्वसन भूखंडावरील ३० चौ.मी. किंवा त्याहून अधिक क्षेत्रफळ असलेल्या सदनिका नियमित करण्यासाठी १ वर्षासाठी "अभय योजना" (Amnesty Scheme) घोषित केली होती. सदर योजना दिनांक ०२/०२/२०२४ रोजी वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ०१/०२/२०२५ रोजी पर्यंत प्राप्त होणाऱ्या अर्जांवर सिडको महामंडळाच्या उक्त ठराव क्र.१२७७०, दिनांक १४/०९/२०२३ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. सदर धोरणानुसार बंगलो प्लॉट वरील इमारतीमधील बहुसदनिका बांधकाम नियमित केल्यानंतर इमारतींच्या पुनर्विकासाठी सिडकोमार्फत ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

(३) सिडको महामंडळाने ठराव क्र.१२७७०, दिनांक १४/०९/२०२३ च्या अनुषंगाने ९० दिवसांसाठी "अभय योजना (Amnesty Scheme)" पुनश्च राबवावी असे शासनाच्या दिनांक ४/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सिडको महामंडळास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जऊळके खुर्द (बो-हाडे) (ता.खेड राजगुरूनगर, जि.पुणे) येथील रस्ते दुरुस्तीची कामे करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१६) २१२६३ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जऊळके खुर्द (बो-हाडे)(ता.खेड राजगुरूनगर, जि.पुणे) येथील अंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीकरीता २५१५-१२३८ लेखाशीर्षांतर्गत रस्ते दुरुस्तीची कामे करण्याचा प्रस्ताव उपविभाग, खेड, जिल्हा परिषद, पुणे यांच्यामार्फत सादर करण्याचे आदेश दिल्यानुसार सदरील प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.ग्रामविकास मंत्री, यांच्याकडे दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतींनिधींनी याबाबत लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावानूसार शासनाने याकरीता निधीची उपलब्धता केली आहे काय तसेच सदरच्या

रस्त्याच्या कामांची दुरूस्ती केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,
(४) अद्याप प्रस्ताव सादर करण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. लेखाशीर्ष २५१५ १२३८ अंतर्गत सदर रस्त्यांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून जिल्हा परिषदेस प्राप्त झालेला नाही.

तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधींनी २५१५ १२३८ लेखाशीर्षाखाली सदर रस्ते दुरूस्तीची कामे शासनाकडे प्रस्तावित केल्यास निधी उपलब्धता व शासन निकष यानुसार पुढील कार्यवाही शक्य आहे. तथापि, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये मौजे जऊळके खुर्द येथे जनसुविधा योजनेंतर्गत रस्त्यांच्या कामांसाठी रुपये ५६.०० लक्ष व ५०५४-इतर जिल्हा मार्ग योजनेंतर्गत रुपये ३०.०० लक्ष रक्कमेच्या कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे.

---

## राज्यात डेंग्यू उपचाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१७) २१३७२ (१९-०४-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५२५२ ला दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात डेंग्यू आजार मोठ्या प्रमाणात पसरला असून जवळपास २१ हजार डेंग्यूचे रुग्ण आढळले असून राष्ट्रीय वेक्टर जनित रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या आकडेवारीनुसार ८४९६ इतकी डेंग्यू आजाराची रुग्णसंख्या असून अनेक जणांचा या आजाराने मृत्यू झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डेंग्यूच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविण्याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (१४-१०-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
राज्यात ऑक्टोबर, २०२३ अखेर एकूण ९९,९९९ रुग्णांचे रक्तजल नमुन्यांची तपासणी करण्यात आली व त्यामध्ये १४,२५१ डेंग्यूचे रुग्ण आढळले असून ६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.
(२) या आजाराच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना राबविल्या जातात-
१) आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन जलद ताप रुग्ण सर्वेक्षण करण्यात येते.
२) या आजाराच्या निश्चित निदानासाठी राज्यामध्ये ५० प्रयोगशाळा कार्यान्वित आहेत.
३) माहे डिसेंबर २०२४ अखेर डेंग्यूसाठी एकूण १,५२,३९७ रक्तजल नमुन्यांची तपासणी करण्यात आली.
४) या आजाराचे शहरी भागामध्ये प्रमाण जास्त असल्याने राज्यातील १३ महानगरपालिकांना सर्वेक्षणासाठी ब्रीडिंग चेकर्सच्या माध्यमातून मनुष्यबळ पुरवठा करण्यात आला आहे.
५) हा आजार एडीस डासांच्या मादीमुळे होत असल्याने साठलेल्या व साठवलेल्या स्वच्छ पाण्याचे साठे रिकामे करणे, झाकून ठेवणे तसेच पाणी वाहते करणे आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळणे

या उपाययोजना केल्या जातात.

६) डास नियंत्रणासाठी आरोग्य कर्मचारी यांचे मार्फत प्रभावी कीटकशास्त्रीय सर्वेक्षण केले जाते.

७) जीवशास्त्रीय उपाययोजनेंतर्गत डिसेंबर २०२४ अखेर १,१६,४६२ इतक्या डास्योत्पत्ती स्थानांमध्ये गप्पी मासे सोडले.

८) दरवर्षी १६ मे हा दिवस राष्ट्रीय डेंग्यू दिवस व जुलै महिना हा डेंग्यू प्रतिरोध महिना विविध उपक्रम घेऊन साजरा केला जातो.

९) शालेय आरोग्य शिक्षणांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना डासआळी प्रात्यक्षिक दाखवून त्या नष्ट करावयाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच, प्रभात फेरी, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अश्या उपक्रमांद्वारे डेंग्यूची जनजागृती केली जाते.

१०) या आजाराला प्रतिबंध करणेसाठी करावयाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करणेसाठी जनतेला आरोग्य शिक्षण देण्यात येते.

११) या आजारामध्ये मृत्यूचे प्रमाण कमी करणेसाठी नवीन डेंग्यू व्यवस्थापन व उपचार पध्दतीचे प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) भिषक (फिजीशियन), बालरोग तज्ञ यांना देण्यात आले. या प्रशिक्षकांनी त्यांचे विभागातील वैद्यकिय अधिकारी व रुग्णालयीन कर्मचारी यांना प्रशिक्षित केले आहे.

१२) दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चिकनगुनिया आणि डेंग्यू प्रादुर्भाव संनियंत्रित करणेसाठी उपाययोजना करणेबाबत शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयाच्या परिसरातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकाम अपूर्ण राहिल्याबाबत

**(१८) २१६२२ (०५-०१-२०२४) श्री.सचिन अहिर, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयाच्या परिसरातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या बांधकामाची मुदत माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान संपली असून आतापर्यंत केवळ २५ टक्केच काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर बांधकाम अर्धवट राहिल्यामुळे रुग्णालयातील खाटांची संख्या वाढवून नव्या इमारतीत विविध विभाग सुरू करण्याचे कामसुद्धा प्रलंबित राहिले असल्याने उक्त इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी शासनाने मुदतवाढ दिली आहे काय व याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे काम संथगतीने सुरु असण्याची कारणे काय आहेत तसेच उक्त इमारतीचे बांधकाम करणाऱ्या संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-१०-२०२५) :** (१) (२) व (३) तांत्रिक अडचणींमुळे बांधकामास झालेला विलंब विचारात घेऊन सदर बांधकामास मुदतवाढ देण्यात आली आहे ही बाब खरी आहे.
तथापि, सद्य:स्थितीत बांधकाम सुरळीत सुरु असून इमारतीचे बांधकाम ऑगस्ट अखेर पर्यंत ७४ टक्के पूर्ण झाले आहे.
(४) लागू नाही

---

## मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यातील (जि.जळगाव) नगरपंचायतींच्या मंजूर मूलभूत सुविधांच्या कामांना दिलेली स्थगिती शिथिल करणेबाबत

**(१९) २१८६० (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यातील (जि.जळगाव) नगर पंचायतींच्या मंजूर असलेल्या कामांना दिलेली स्थगिती व ग्रामविकास व पंचायतराज विभागाकडून मंजूर मूलभूत सुविधाच्या कामांना दिलेली स्थगिती शिथिल करणेकामी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे पत्रव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यातील (जि.जळगांव) नगरपंचायतींच्या मंजूर असलेल्या कामांना दिलेली स्थगिती व ग्रामविकास व पंचायतराज विभागाकडून मंजूर मूलभूत सुविधाच्या कामांना दिलेली स्थगिती शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१८-०९-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि, मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यातील (जि.जळगांव) नगरपंचायतींच्या मंजूर असलेल्या कामांना दिलेली स्थगिती नगरविकास विभागाच्या दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये उठविण्यात आली आहे.
तसेच, ग्रामविकास विभागाकडील सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील मूलभूत सुविधांच्या कामांना दिलेली स्थगिती दिनांक १९/१०/२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये उठविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पावने, नवी मुंबई (जि.ठाणे) येथील नवभारत इंडस्ट्रियल केमिकल कंपनीला आग लागून झालेल्या नुकसानीबाबत

**(२०) २४११२ (०८-०८-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पावने खैरणे, नवी मुंबई (जि.ठाणे) येथील एमआयडीसीतील नवभारत इंडस्ट्रीयल केमिकल कंपनीला भीषण आग लागून कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीला लागलेल्या आगेचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०५-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ठाणे ट्रान्स क्रीक (टी.टी.सी.) मध्ये एकूण २३३३.३४ हेक्टर क्षेत्रावर औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यात आले आहे.

मे.नवभारत इंडस्ट्रीज, प्लॉट नं. ए-७३७/१, पाणे औद्योगिक क्षेत्र हा कारखाना सन १९९७ साली अस्तित्वात आला असून, सदर कारखान्याचे एकूण क्षेत्रफळ १००० चौ.मी. आहे. सदर कारखान्यात पॅराडाय-क्लोरोबेंझिन (PDCB) या रासायनिक पावडरचा वापर करुन नॅपथालींग बॉल्स (डांबरगोळी), एयरफ्रेशनर व कापूर या पक्क्या मालाचे उत्पादन केले जात होते.

दिनांक ०२/०४/२०२४ रोजी सकाळी १०.३० वा.सदर कपंनीला आग लागल्याची वर्दी प्रमुख अग्निशमन विमोचक, टी.बी.आय.ए अग्निशमन दल कोपर खैरणे यांनी महामंडळाच्या टी.टी.सी.आर. ब्लॉक नियंत्रण कक्षास दिली. अग्निशमन केंद्र अधिकारी, म.औ.वि. महामंडळ टी.टी.सी.आर. ब्लॉक यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार मे.नवभारत इंडस्ट्रीज, प्लॉट नं. ए-७३७/१ या कंपनीत कच्चा माल म्हणून वापरल जाणारी पॅराडाय-क्लोरोबेंझिन (PDCB) रासायनिक पाडर आगीमुळे मेल्ट होऊन वाहत गेली व दक्षिण बाजुस असलेल्या मे.गोयंका फुडस,प्लॉट नं.ऐ-७७३/२ व मे.जस्मिन प्रिटर लिमिटेड, भुखंड क्र.ऐ-७७३/३ या कंपनीच्या बेसमेंटमध्ये जाऊन आगीने पेट घेतला. मे.गोयंका फुडस, प्लॉट नं.ऐ-७७३/२ या कंपनीच्या बेसमेंटमध्ये मोठ्या प्रमाणावर खद्यपदार्थ व तेल असल्यामुळे आग खुप मोठ्या प्रमाणावर वाढू लागली. सदर आगीत मे.नवभारत इंडस्ट्रीज, प्लॉट नं. ए-७३७/१, मे.गोयंका फुडस,प्लॉट नं.ऐ-७७३/२ व मे.जस्मिन प्रिटर लिमिटेड, भुखंड क्र.ऐ-७७३/३ या तीनही कंपन्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. सदर आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी मऔवि महामंडळाच्या तळोजा, ति.अंबरनाथ् अग्निशमन दल, नवी मुंबई अग्निशमन दल व सिडको अग्निशमन दल यांना पाचारण करण्यात आले होते. सतत तीन दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. सदर दुर्घटनेत कोणीही जखमी अथवा मृत झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.